लोकमत

# संशोधनातील यश प्रेरणादायी : कदम

## भारत भोसले यांचे पेटंट : शहरी पर्यावरणपूरक गार्डनिंगसाठी उपयुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपोडे बुद्रुक** : प्राचार्य डॉ. भारत भोसले यांचे सस्टेनेबल एनर्जी इफिसिएंट इंटेलिजंट रोबोटिक इरिगेशन हे आयओटीवर आधारित संशोधन भविष्यातील शहरी पर्यावरणपूरक गार्डनिंगसाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. त्यांचे यश महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे,' असे गौरवोद्गार मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे विश्वस्त इंजिनिअर अरविंद कदम यांनी काढले.

देऊर येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयामध्ये प्राचार्य भारत भोसले यांच्या संशोधन क्षेत्रातील यशाबद्दल आयोजित गौरव समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य, प्राध्यापक, सेवक महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

कदम म्हणाले, 'संशोधन क्षेत्रातील यशासह प्राचार्य डॉ. भारत भोसले यांची डार्विन ऑस्ट्रेलिया येथे आंतरराष्ट्रीयस्तरावरील आयोजित द्विवार्षिक आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये व्याख्याता म्हणून सहभागी होण्याची संधी ही बाब महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांनी त्याचे अनुकरण करावे.

प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी म्हणाले, 'भविष्यातील शहरी पर्यावरणपूरक गार्डनिंगसाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये पर्यावरण, कार्बन उत्सर्जन, अक्षय ऊर्जास्त्रोत, सॅटेलाइट इन्फर्मेशन, इमेजनरी, उपलब्ध जागा, क्लायमेटिक डाटा अशा २८ पॅरामीटर्स व २८० व्हेरिएबल्स गणिती सूत्राने मांडून, तसेच मशिन लर्निंग अल्गोरियमच्या साहाय्याने रोबोट संचलन संचालित केले आहे.